महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांकः राक्रीधो- २०१९ / प्र.क्र. ९४ /क्रीयुसे-१

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२
तारीख: २८ मे, २०१९.

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२०१२/ प्र.क्र. २६०/ क्रीयुसे-१, दिनांक १ मार्च, २०१४.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२०१८/ प्र.क्र. १५७/ क्रीयुसे-१, दिनांक ८ मार्च, २०१९.

प्रस्तावना:-

राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जा सुधारणा, दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध होण्याकरीता राज्य क्रीडा धोरण-२०१२ अंतर्गत, राज्यातील खाजगी/शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या व राज्य शासनाच्या संबंधीत विभागांनी मान्यता दिलेल्या शैक्षणिक संस्था, विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीबद्ध अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना इत्यादींना क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहीत्यासाठी अनुदान देण्याबाबत योजनेस संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

जानेवारी, २०१९ मध्ये U-१७ व U-२१ **मुलांमुलींसाठी** आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स-२०१९ या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याने २८८ पदके मिळवून स्पर्धेमध्ये सामायिक विजेतेपद मिळविले आहे. अशा स्पर्धांच्या अनुषंगाने राज्यातील युवकांच्या क्रीडा नैपुण्याबरोबरच, क्रीडा प्रसार व खेळातून आरोग्य वर्धन यांचा मोठया प्रमाणात प्रसार केला गेला आहे.

तसेच सन २०१८-१९ या वर्षामध्ये क्रीडा सुविधा निर्मिती आर्थिक सहाय्य योजनेखाली प्रपत्र “ब” मध्ये नमूद केल्यानुसार केवळ क्रीडा साहीत्य पुरविण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. सदरचे साहीत्य हे मोठया प्रमाणात खेळाडूंना उपलब्ध झाल्यामुळे विविध खेळ खेळण्यासाठी विविध गटातील मुले खेळ खेळण्यासाठी प्रवृत्त होतील त्याचा खेळाकडे कल वाढेल व त्याचा परिणाम त्यांचे आरोग्य सुधारण्यावर होणार आहे. त्यामुळे सृदृढ बनतील हा प्रमुख उद्देश आहे.

यासंदर्भातील दिनांक १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये क्रीडा सुविधा निर्मितीकरीता ज्या अटी/ शर्ती घालण्यात आल्या आहेत, त्या जंगम मालमत्ता निर्मितीसाठी आहेत. त्या अटी क्रीडा साहीत्य पुरविण्यासाठी शासन निर्णय दिनांक १ मार्च, २०१४ मध्ये नमूद जंगम मालमत्ता निर्मितीबाबत अटी व शर्ती सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी शिथिल करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन शुध्दीपत्रक:-

राज्य क्रीडा धोरण-२०१२ नुसार राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था या मधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणेकरीता मुलांना विविध मैदानी खेळ खेळण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी तसेच त्याद्वारे खेळाडूंच्या कामगिरीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात आले आहे. ग्रामीण तसेच आदिवासी भागातील खेळाडूंना त्याच्यामधील क्षमतेचा वाव मिळण्यासाठी व सामान्य नागरिकांच्या शारिरीक तंदुरुस्तीसाठी क्रीडा साहीत्य उपलब्ध व्हावे, याकरीता, दिनांक १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये क्रीडा साहीत्य पुरविण्यासाठी लागू करण्यात आलेल्या क्र.४(अ)(२) येथील अट सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता शिथील करण्यात यावी.

२. उपरोक्त शासन निर्णयातील अनुदान मंजूरीच्या अटी व शर्तीतील अट क्रमांक ४ (ब)(२) (६) व (९) येथे “संबंधीत संस्थेच्या मालकीच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असणे” त्याऐवजी “संस्थेने क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील” असा बदल करण्यास शासन मान्यता देत आहे. ही सूट सन २०१८-१९ करीता शिथिल करण्यात येत आहे.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१५२०१६४०२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.05.28 15:23:47 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
४) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद यांचे सचिव.
६) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा.
८) सर्व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद.

९) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१३) सर्व विभागीयआयुक्त (महसूल)
१४) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल समिती (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
१५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
१६) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
१७) सर्व जिल्हा / तालुका क्रीडा अधिकारी (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यामार्फत)
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/ २, मुंबई/ नागपूर.
१९) महालेखापाल (लेखा व परिक्षा) महाराष्ट्र १/ २, मुंबई/ नागपूर.
२०) ग्रंथपाल, विधीमंडळ
२१) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
२२) अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे -३)
२३) निवडनस्ती, क्रीयुसे-१.